## नियमित दिवाणी दावा क्र. ३२/२०१५

## आदेश निशाणी ३९ खाली

१ वादी यांनी दिवाणी प्रकिया संहितेच्या आदेश २६ क्रम ९ नुसार दावा मिळकतीची मोजणी उपअधिक्षक, तालुका भूमिअभिलेख कार्यालय, पंढरपूर यांच्यामार्फत करुन मिळावी यासाठी प्रस्तुतचा अर्ज सादर केला आहे.

२ वादीचे संक्षिप्त कथन खालीलप्रमाणे:

प्रस्तुत प्रकरणी तुर्तातुर्त मनाई आदेशाचा अर्ज निशाणी ५ बाबत सुनावणी पुर्ण झालेली आहे. सुनावणी दरम्यान प्रतिवादींतर्फे दावा मिळकत व सर्व्हे क्र. १ बाबतच्या मोजणीचा नकाशा मो.क्र. ३८९९ सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार वादीनेच सरकारी मिळकतीवर १ एकर क्षेत्रावर अतिक्रमण केलेले आहे असे प्रतिवादीचे कथन आहे. याउलट वादीच्या कथनानुसार उपरोक्त मोजणी त्याच्या गैरहजेरीत, बेकायदेशीरपणे करण्यात आलेली आहे. त्यामुळेच या नकाशावर विसंबुन राहून निशाणी ५ बाबत निर्णय करणे न्यायासंगत होणार नाही. त्यामुळेच दि.प्र.स. च्या आ. २६ क्र. ९ नुसार उपअधिक्षक, तालुका भूमिअभिलेख कार्यालय, पंढरपूर यांची नियुक्ती न्यायालयीन आयुक्त म्हणून करण्यात यावी व त्यांच्यामार्फत दावा मिळकतीची मोजणी करुन हद्द खुणा निश्चित करण्यात याव्यात यासाठी हा अर्ज वादीतर्फे सादर करण्यात आला.

३. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्यातर्फे तीव्र आक्षेप नोंदविण्यात आला. त्यांच्या कथनानुसार मो.र. क्र. ३८९९ ही वादीच्या समक्ष उपअधिक्षक तालुका निरिक्षक भूमिअभिलेख, पंढरपूर यांच्यातर्फे दावा मिळकतीची व गट क्र. १ ची मोजणी करण्यात आलेली आहे. मात्र वादीने या मोजणीच्या

वेळी सही करण्यास नकार दिला. वादीला या मोजणीविरुध्द सक्षम अधिका—याकडे दाद मागण्याची मुभा आहे. प्रतिवादींतर्फे उपरोक्त मोजणीचा नकाशा सादर करण्यात आलेला आहे व केवळ बंधा—याचे कामकाज प्रलंबित ठेवण्याच्या उद्देशान हा अर्ज देण्यात आलेला आहे त्यामुळे अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली.

४. प्रकरणाची कागदपत्रे अभ्यासली. वादींचे विद्वान वकील श्री. के. एम. घाडगे व प्रतिवादी क्र. १ व ३ यांचे विद्वान सरकारी वकील श्री. ए. डी. भोसले व प्रतिवादी क्र. २, ४ व ५ यांचे विद्वान वकील श्री. एस. एल. साठे यांचा युक्तिवाद ऐकला. त्यावरुन मी खालील मुददे निश्चित केले आणि त्यावर माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| मुददे | निष्कर्ष |
|---|---|
| १.अर्ज निशाणी ३९ मंजूर करुन अर्जात नमूद केल्याप्रमाणे दावा मिळकतीची मोजणी करण्यासाठी उपअधिक्षक, तालुका भूमिअभिलेख कार्यालय, पंढरपूर यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यास वादी पात्र आहे का ? | होकारार्थी |
| २ काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारण मिमांसा

**मुददा क १ साठीः**

५. प्रस्तुतप्रकरणी प्रतिवादी हे बंधा—याचे बांधकाम दावा मिळकतीमध्ये करत आहेत आणि त्यामुळे त्यांचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश देण्यात यावा यासाठी वादीने निशाणी ५ सादर केलेला आहे. या अर्जाची सुनावणी देखील

झालेली आहे. या सुनावणी दरम्यान प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये बांधकाम करत नसून सरकारी जमिनीवर बांधकाम करत आहेत असे प्रतिवादींचे कथन आहे. ही बाब सिध्द करण्यासाठी त्यांनी दावा मिळकत व पंढरपूर येथील गट क्र. १ याच्या मोजणीबाबतचा एक नकाशा मो.र.क्र. ३८९९ सादर केला आणि त्यानुसार वादी हा सरकारी जमीनीवरील १ एकर क्षेत्रावर वहिवाट करीत आहे असे त्यांचे कथन आहे. याच नकाशावर विसंबून वादीचा तुर्तातुर्त मनाई आदेशाचा अर्ज फेटाळण्यात यावा असे त्यांचे कथन आहे. याउलट वादीच्या कथनानुसार तो या मोजणीस हजरही नव्हता आणि या नकाशामध्ये दावा मिळकतीच्या हद्दी खुणा निश्चित दाखविलेल्या नाहीत आणि त्यामुळेच ती मोजणी वादीवर बंधकनकारक नाही असे त्याचे कथन आहे.

६. एकंदरीत प्रकरणाची वस्तुस्थिती पाहता उपरोक्त मोजणी नकाशामध्ये वादीच्या निश्चित क्षेत्राचा वेगळा उल्लेख केलेला नाही तसेच या मोजणीबाबत वादीच्या संमतीविषयी व उपस्थितीविषयी संदिग्धता आहे. तसेच वादीने सादर केलेला इतर लेखी पुरावा पाहता दावा मिळकतीची मोजणी होणे गरजेचे दिसते वादीच्या कथनानुसार तो मो.र.क्र. ३८९९ मध्ये सामिल नसल्यामुळे त्या मोजणीविरुध्द त्याला वरिष्ठ अधिका—यांकडे दाद मागण्याची कसलीही गरज नाही. सबब दावा मिळकतीच्या हद्दी खुणा निश्चित झाल्यास या प्रकरणातील वादाचा योग्य न्यायनिर्णय होण्यास मदत होणार आहे. तसेच उपरोक्त मोजणी तात्काळ करावी असा आदेश दिल्याने प्रतिवादींचे कामकाजदेखील प्रलंबित राहणार नाही. त्यामुळे उपअधिक्षक, तालुका भूमिअभिलेख कार्यालय, पंढरपूर यांना दावा मिळकतीची मोजणी करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त नेमणे न्यायसंगत राहिल. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर

*''होकारार्थी''* असे देतो.

**मुददा क्र २ साठी**

७. मुददा क्र १ चे होकारार्थी उत्तर पाहता अर्ज निशाणी ३९ मंजूर करणे न्यायसंगत राहिल. सबब मी मुददा क्र २ चे उत्तर खालीलप्रमाणे देतो.

आदेश

१ अर्ज निशाणी ३९ मंजूर करण्यात आला

२ उपअधिक्षक, तालुका भूमिअभिलेख कार्यालय, पंढरपूर यांची दावा मिळकतीची मोजणी करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त म्हणून दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश २६ क्र. ९ नुसार नेमणुक करण्यात येत आहे.

३. वादीने मोजणीसाठी येणारा विहीत खर्च उपअधिक्षक, तालुका भूमिअभिलेख कार्यालय, पंढरपूर यांच्या कार्यालयात दि. २९.०५. २०१५ पर्यंत जमा करावा.

४. उपअधिक्षक, तालुका भूमिअभिलेख कार्यालय, पंढरपूर यांनी लगतच्या कब्जेदारांना नोटीसा देवून नियमानुसार दावा मिळकतीची मोजणी करुन नकाशासह मोजणी अहवाल दि. ०१.०६.२०१५ रोजी किंवा त्यापुर्वी सादर करावा.

दिनांक २८.०५.२०१५

( हे. भा. सिरसाळकर)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर पंढरपूर